ISSN NO. 2231-4059 (PRINT)

UGC Care Group –1 Journal

# भाषा आणि जीवन

(विशेषांक)

वर्ष– ३९ संख्या. –०४

ऑक्टोबर – डिसेंबर २०२१



# भाषा आणि जीवन

वर्ष – ३९ संख्या – ०४
ऑक्टोबर – डिसेंबर २०२१

**ISSN NO. 2231- 4059 (PRINT)**

**(UGC Care Group-1)**

मराठी अभ्यास परिषद
आनंदनगर, पुणे ४११०५१

@ भाषा आणि जीवन


## मराठी अभ्यास परिषद

आनंदनगर, पुणे ४११०५१.

**Email ID : bhashaaanijeevan@gmail.com**
**Editorbhashaa-jeevan@gmail.com**

**TEL :03242– 256924**

**FAX :03243– 256924**

# कार्यकारी मंडळ सदस्य व पदाधिकारी
# मराठी अभ्यास परिषद
कार्यकारी मंडळ सदस्य व पदाधिकारी

अध्यक्ष
सलील वाघ

उपाध्यक्ष
विजय पाध्ये

कार्यवाह
प्रा.सुप्रिया खाडिलकर

सहकार्यवाह
मयूर गोहाड

कोषाध्यक्ष
वैशाली कार्लेकर

कार्यकारी मंडळ सदस्य
डॉ.आनन्द काटीकर
रमेश पानसे

डॉ.उमेश करंबेंळकर

डॉ.रावसाहेब काळे

प्रा. कलिका मेहता

सुशिल धसकटे

# अनुक्रमणिका



| क्र. | शीर्षक | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| 1. | ऐतिहासिक स्त्रोतांचा शोध : एक मूल्यमापन | डॉ. कैलास फुलमाळी | 01 |
| 2. | माहीती आणि ज्ञान | चंद्रकांत प्रल्हाद सोनवने | 05 |
| 3. | भारतीय न्यायप्रणालीत लोक अदालतींचे महत्व | चंद्रमणी काशीनाथ भोवते<br>डॉ. अनिल सि. बनकर | 10 |
| 4. | अपार्थिवाचे चांदणे : आस्वादक समीक्षेचे मार्गदर्शक डॉ. द. भि. कुलकर्णी | प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 18 |
| 5. | ज्ञान प्राप्तीचे एक साधन म्हणून न्याय दर्शनातील प्रत्यक्ष प्रमाण : एक संक्षिप्त विवेचन | डॉ. अतुल महाजन | 23 |
| 6. | बौद्धांचे तत्वज्ञान | प्रा. डॉ.भुसारे एस. आर. | 28 |
| 7. | मानव्यविद्याशाखा अंतर्गत ज्ञान प्राप्तीचे स्त्रोत-एक अध्ययन | डॉ. दिपक जी. अराजपुरे | 32 |
| 8. | ऐतिहासिक संशोधनात कागदपत्रांची निवड (साधन सामुग्रीची निवड) | प्रा.डॉ.महेंद्र वि.गायकवाड<br>डॉ.मधूकरराव वासनिक | 36 |
| 9. | भारतीय तत्वज्ञानातील वस्तुनिष्ठ ज्ञानाचे साधन : ऐंद्रिय अनुभव की गूढ अंत– दृष्टी ? | डॉ. मनोज उत्तमराव पाटील | 42 |
| 10. | भारतीय ज्ञानमिमांसेच्या अनुशंगाने ज्ञानाचे स्त्रोत या शब्दाचे विश्लेषण | डॉ. मोनालिसा अ. खानोरकर | 46 |
| 11. | बोधातून प्राप्त ज्ञान : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. संतोश पंढरीनाथ मेंढेकर | 51 |
| 12. | न्याय दर्शनातील यथार्थ ज्ञान साधनांचे स्वरुप आणि महत्व | प्रा. डॉ. सीमा देशपांडे | 56 |
| 13. | मध्यकालीन महाराष्ट्रीय संतांच्या कार्याचा मागोवा | डॉ. श्रीकांत डी. पानघाटे | 60 |
| 14. | आंबेडकरवादी इतिहास लेखन प्रवाह: अर्थ, व्याप्ती, तत्वज्ञान आणि स्त्रोत साधने | डॉ. सूर्यकांत महादेवराव कापशीकर | 67 |
| 15. | ज्ञान : संकल्पना आणि ज्ञानाचे विविध स्त्रोत | डॉ. बाळासाहेब मुळीक | 75 |
| 16. | कोरोना काळातील आरोग्य विषयक जागरूकता - एक चिकीत्सा | डॉ. किर्ती आ. वर्मा | 80 |

# अनुक्रमणिका


| क्र. | | | |
|---|---|---|---|
| 1. | ऐतिहासिक स्त्रोतांचा शोध : एक मूल्यमापन | डॉ. कैलास फुलमाळी | 01 |
| 2. | माहीती आणि ज्ञान | चंद्रकांत प्रल्हाद सोनवने | 05 |
| 3. | भारतीय न्यायप्रणालीत लोक अदालतींचे महत्व | चंद्रमणी काशीनाथ भोवते<br>डॉ. अनिल सि. बनकर | 10 |
| 4. | अपार्थिवाचे चांदणे : आस्वादक समीक्षेचे मार्गदर्शक डॉ. द. भि. कुलकर्णी | प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 18 |
| 5. | ज्ञान प्राप्तीचे एक साधन म्हणून न्याय दर्शनातील प्रत्यक्ष प्रमाण : एक संक्षिप्त विवेचन | डॉ. अतुल महाजन | 23 |
| 6. | बौद्धांचे तत्वज्ञान | प्रा. डॉ.भुसारे एस. आर. | 28 |
| 7. | मानव्यविद्याशाखा अंतर्गत ज्ञान प्राप्तीचे स्त्रोत-एक अध्ययन | डॉ. दिपक जी. अराजपुरे | 32 |
| 8. | ऐतिहासिक संशोधनात कागदपत्रांची निवड (साधन सामुग्रीची निवड) | प्रा.डॉ.महेंद्र वि.गायकवाड<br>डॉ.मधूकरराव वासनिक | 36 |
| 9. | भारतीय तत्वज्ञातातील वस्तुनिष्ठ ज्ञानाचे साधन : ऐंद्रिय अनुभव की गूढ अंत–दृष्टी ? | डॉ. मनोज उत्तमराव पाटील | 42 |
| 10. | भारतीय ज्ञानमिमांसेच्या अनुशंगाने ज्ञानाचे स्त्रोत या शब्दाचे विश्लेषण | डॉ. मोनालिसा अ. खानोरकर | 46 |
| 11. | बोधातून प्राप्त ज्ञान : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. संतोश पंढरीनाथ मेंढेकर | 51 |
| 12. | न्याय दर्शनातील यथार्थ ज्ञान साधनांचे स्वरुप आणि महत्व | प्रा. डॉ. सीमा देशपांडे | 56 |
| 13. | मध्यकालीन महाराष्ट्रीय संतांच्या कार्याचा मागोवा | डॉ. श्रीकांत डी. पानघाटे | 60 |
| 14. | आंबेडकरवादी इतिहास लेखन प्रवाह: अर्थ, व्याप्ती, तत्वज्ञान आणि स्त्रोत साधने | डॉ. सूर्यकांत महादेवराव कापशीकर | 67 |
| 15. | ज्ञान : संकल्पना आणि ज्ञानाचे विविध स्त्रोत | डॉ. बाळासाहेब मुळीक | 75 |
| 16. | कोरोना काळातील आरोग्य विषयक जागरूकता - एक चिकीत्सा | डॉ. किर्ती आ. वर्मा | 80 |

| | | | |
|---|---|---|---|
| 17. | समाजशस्त्रातील ज्ञानार्जनाचे स्त्रोत : एक चिकीत्सा | डॉ. ओमप्रकाश आष्टनकर | 85 |
| 18. | विदर्भ राज्याची मागणी व जनतेची भूमिका | डॉ. रायन ञ्यं. महाजन<br>डॉ. संदीप तुंडूरवार<br>डॉ. शरद सांबारे | 89 |
| 19. | भारतीय तत्वज्ञानातील ज्ञानाचे स्त्रोत | प्रा.डॉ.शेंडगे विजय सोपानराव | 94 |
| 20. | न्यायदर्शनातील अनुमान प्रमाण-स्वरुप व प्रकार | प्रा.सौ.जयश्री तांबे | 100 |
| 21. | ज्ञानाच्या स्त्रोतात जैन दर्शनातील अनुमान प्रमाणाचे महतवपूर्ण योगदान | प्रा. वर्षा जपे | 103 |
| 22. | वैयक्तिक आणि सामाजिक स्तरावरील पर्यावरणविषयक उपक्रमाचा अभ्यास | डॉ.महादेव विष्णू मत<br>श्रीमती शिवकन्या निवृत्तीराव कदेरकर | 108 |
| 23. | समाजसुधारक संतश्री गाडगे महाराज | प्रा. योगेश मारोती करवाडे | 112 |
| 24. | संगीत उपासनेचा मानवी जीवनावर होणारा सकारत्मक परिणाम | प्रा. वैखरी वझलवार | 118 |
| 25. | 'भारतीय दर्शनातील शब्द प्रमाण' | डॉ. नरेद्र वसंतराव रघटाटे | 121 |
| 26. | ज्ञानशास्त्र.. एक आव्हान | प्रा.रजनी आनंदराव काळे | 128 |

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

# 'भारतीय दर्शनातील शब्द प्रमाण'

डॉ. नरेंद्र वसंतराव रघटाटें

सहायक प्राध्यापक व तत्त्वज्ञान विभागप्रमुख श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, उमरेड रोड, नागपूर

• **गोषवारा :**

भारतीय दर्शनात ज्ञान या संकल्पनेचा अभ्यास केल्या जातो ज्या अंतर्गत आत्मतत्वाला महत्वाचे स्थान आहे. प्रमा, अप्रमा, प्रमाण, प्रामाण्य, प्रमाता, प्रयेय इत्यादींची चर्चा तत्त्वज्ञानाच्या ज्या शाखेत केली जाते त्यास ज्ञानमीमांसा (Epistemology) असे म्हणतात. ज्ञानमीमांसेत ज्ञानाचे स्वरूप, ज्ञानाचे साधन, त्याचा विकास, त्याची वास्तविकता किंवा यथार्थता, त्याची मर्यादा तथा यांच्या उद्दिष्टांचा प्रामुख्याने विचार होतो. पाश्चात्य तत्त्वज्ञानात ज्ञानाचे स्त्रोत (Sources of Knowledge) - (1) बुद्धिवाद आणि (2) अनुभववाद हे सांगीतले आहेत, परंतु भारतीय दर्शनात प्रमाचे ज्ञान ज्याने होते त्यास प्रमाण म्हटल्या जाते व या प्रमाणांचा सखोलतेने अभ्यास केलेला आहे. भारतीय तत्त्वज्ञान वैदिक व अवैदिक मध्ये विभागले गेले आहेत. अवैदिक वर्गातील चार्वाक तथा बौद्ध दर्शनाला शब्द प्रमाण मान्य नाही. यासोबतच वैदिक वर्गातील वैशोषिक दर्शन सुध्दा शब्द प्रमाणाला प्रमाण म्हणून मानत नाही. व्युत्पत्ति दृष्ट्या 'शब्द' ध्वनि (शब्दयति) चा पर्याय आहे. न्याय, सांख, योग,जैन, मीमांसा व वेदांती दर्शन शब्द प्रमाणाला स्विकारीतात. जैन दर्शनात व योगदर्शनातसुद्धा श्रुत ज्ञान किंवा शब्दज्ञानाला 'आगम' म्हटले आहे. शब्दप्रमाणासंदर्भात सांख्य दर्शनाचे मत न्यायांसारखेच आहेत. शबर भाष्य या मध्ये शब्दप्रमाणाच्या चर्चेचा आरंभ झालेला दिसुन येतो. न्यायसुत्रकार गौतम हे आप्त उपदेष, आप्तवचन याला शब्द प्रमाण मानतात. वाक्याच्या योग्य रचनेकरिता पदांमध्ये परस्पर आकांशा, योग्यता आसक्ति (सन्निधि) व तात्पर्य हे गुण असायला हवेत. जेव्हा आपण एखाद्या वाक्याला ऐकतो तेव्हा आपणास त्याच्या अर्थाचा बोध होतो. येथे प्रश्न असा निर्माण होतो की, अर्थ हा संपूर्ण वाक्यातून निघतो की वाक्यातील घटक पदांच्या अर्थाच्या एकत्रिकरणातून? वाक्यार्थ बोध यासंदर्भात वेगवेगळ्या तत्त्वज्ञांनी वेगवेगळी मते दिलेली दिसुन येते. जसे. अभिहितान्वयवाद, अन्विताभिदानवाद, समुच्चयवाद, तात्पर्यवाद. येथे आपण फक्त अभिहितान्वयवाद व अन्विताभिदानवाद याचाच विचार करणार आहोत.

• **उद्दिष्टे :**

1) तत्त्वज्ञानाच्या शाखेतील ज्ञानमीमांसा (Epistemology) यातिल प्रमा, अप्रमा, प्रमाण, प्रामाण्य, प्रमाता, प्रयेय इत्यादींचा अभ्यास करणे

2) ज्ञानमीमांसेत ज्ञानाचे स्वरूप, ज्ञानाचे साधन, त्याचा विकास, त्याची वास्तविकता किंवा यथार्थता, त्याची मर्यादा तथा यांच्या उद्दिष्टांचा विचार करणे

3) भारतीय तत्त्वज्ञान अवैदिक वर्गातील चार्वाक, वैशोशिक तथा बौद्ध दर्शनाला शब्द प्रमाण मान्य नाही तर वैदिक वर्गातिल बाकी दर्शन याला प्रमान मानतात त्यांची तुलना करणे तसेच

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

4) वाक्यार्थ बोध यासंदर्भात वेगवेगळ्या तत्त्वज्ञांनी जी वेगवेगळी मते दिलेली आहे त्यांची चिकित्सा करून व्यावहारिक जिवनात याचा यथोचित वापर करणे जेनेकरून ज्ञानाच्या संदर्भात समस्या उद्भवणार नाहित.

- **सिध्दांत कल्पना :** वाक्यार्थ बोधा संदर्भात वेगवेगळ्या विचारवंतांनी जी मते मांडली त्यासंदर्भात म्हणजे अभिहितान्वयवाद व अन्विताभिदानवाद याचाच विचार करून न्यायांनी या संदर्भात केलेल्या कार्यापेक्षा मीमांसकांचे कार्य उल्लेखनिय व भरीव आहे असे मला वाटते.

- **संशोधन पध्दति :** प्रस्तुत शोध निबंधाचा अभ्यास करण्याकरिता जी संशोधन पध्दती वापरण्यात येणार आहे ती म्हणजे 'चिकित्सक विश्लेषण पध्दती होय.'

- **प्रस्तावना :**

एखादी गोष्ट जाणण्याची उत्सुकता प्रत्येक मनुष्यात असते. म्हणून मानव ज्ञान प्राप्त करू इच्छितो. तो प्रकृती संबंधी, आपल्या स्वतः संबंधी तथा विश्वाच्या पलीकडे जर कोणती एखादी सत्ता असेल तर त्याचेही ज्ञान प्राप्त करण्याची लालसा ठेवतो. या व्यतिरिक्त स्वतः 'ज्ञान' या विषयी सुद्धा मनुष्य ज्ञान प्राप्त करणे इच्छितो. मानवाला ज्ञान कसे होते, कोणत्या कोणत्या वस्तुचे, घटकाचे त्यास ज्ञान होऊ शकते, ज्ञानाचे उद्दिष्ट काय, किंवा ज्याचे ज्ञान होते त्याचे वास्तविक स्वरूप काय इत्यादी ज्ञानासंबंधी प्रश्न आहेत ज्याची उकल करणे मनुष्य इच्छितो.

आपला मेंदू हा ज्ञान प्राप्त करणारे यंत्र होय. तथापी भारतीय दर्शनात आत्मतत्वाला यासंदर्भात महत्वाचे स्थान आहे. प्रमा, अप्रमा, प्रमाण, प्रामाण्य, प्रमाता, प्रयेय इत्यादींची चर्चा तत्त्वज्ञानाच्या ज्या शाखेत केली जाते त्यास ज्ञानमीमांसा (Epistemology) असे म्हणतात. 'Epistemology' हा इंग्रजी शब्द Epistem (ज्ञान) आणि Logia (मीमांसा) च्या संयोगातुन निर्माण झाला आहे. ज्ञानमीमांसेत ज्ञानाचे स्वरूप, ज्ञानाचे साधन, त्याचा विकास, त्याची वास्तविकता किंवा यथार्थता, त्याची मर्यादा तथा यांच्या उद्दिष्टांचा यात प्रामुख्याने विचार होतो. भारतीय तत्त्वज्ञानात प्रारंभापासूनच सर्वच तत्त्वज्ञांचे याकडे लक्ष होते व त्यांनी आपापल्या दर्शनात याचा उहापोह सुध्दा केलेला दिसून येतो.

पाश्चात्य तत्त्वज्ञानात Sources of Knowledge ज्ञानाचे स्त्रोत – (1) बुद्धिवाद आणि (2) अनुभववाद सांगीतलेले आहेत परंतु भारतीय दर्शनात प्रमाचे ज्ञान ज्याने होते त्यास प्रमाण म्हटल्या जाते व या प्रमाणांचा सखोलतेने अभ्यास केलेला आहे.

- **प्रमाण** :– प्रमाण सहा आहेत – 1) प्रत्यक्ष प्रमाण, 2) अनुमान प्रमाण, 3) उपमान प्रमाण, 4) शब्द प्रमाण, 5) अर्थापत्ती प्रमाण आणि 6) अनुपलब्धी प्रमाण.

येथे आपण प्रामुख्याने शब्द प्रमाण व त्यातील वाक्यार्थ बोधासंबंधी चर्चा करणार आहोत.

भारतीय तत्त्वज्ञान वैदिक व अवैदिक या दोहोंमध्ये विभागले गेले आहेत. अवैदिक वर्गातील चार्वाक तथा बौद्ध दर्शनाला शब्द प्रमाण मान्य नाही. यासोबतच वैदिक वर्गातील वैशेषिक दर्शन सुध्दा शब्द प्रमाणाला प्रमाण म्हणून मानत नाही.

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

व्युत्पत्ति दृष्ट्या 'शब्द' ध्वनि (शब्दयति) चा पर्याय आहे. सामान्यांच्या दृष्टिने शब्द तथा पद यामध्ये काहीही भेद नाही. ज्याने अर्थाचा बोध होतो तो 'शब्द' असेही काही तत्त्वज्ञ मानतात. ज्ञानमीमांसेत शब्दाला एक प्रमाण म्हणून स्विकारल्या जाते.

भारतीय तत्त्वज्ञानात वेगवेगळ्या दर्शनांनी शब्द प्रमाणाला स्विकारले आहे, ते पुढीलप्रमाणे –

**अ) चार्वाक मत :–**

चार्वाक शब्द प्रमाणाला स्विकारीत नाही. त्यांनी फक्त प्रत्यक्षालाच प्रमाण मानले आहेत व म्हणून ते दुसऱ्यांच्या म्हणण्यावर (वचनावर) विश्वास ठेवित नाही. ते म्हणतात की, या प्रकारे तर त्यांना मुर्खाच्या वचनांना सुद्धा प्रमाण म्हणावे लागेल. जरी केवळ विश्वासनिय व्यक्तिंचे वचन मानले तरी ते अनुमान होऊन जाईल ज्यात अनवस्था दोष निर्माण होईल व म्हणून शब्द प्रमाणाचा ते स्विकार करित नाही.

**ब) बौद्धमत :–**

बौद्ध दर्शन सुद्धा शब्द प्रमाणाला एक स्वतंत्र प्रमाण म्हणून स्विकारीत नाही. त्यांच्या मते, शब्द प्रमाणाचा अंतर्भाव प्रत्यक्ष वा अनुमानात या दोहोत होऊन जातो. ते म्हणतात की, 'जो व्यक्ति विश्वसनिय कथन करतो तो आप्त (आप्तवचन)' तर हे सरळ सरळ अनुमानच ठरते. जर आपण असे म्हणालो की, आप्त व्यक्तिचे कथन यथार्थ असल्यामुळे ते विश्वसनिय आहे तर हे प्रत्यक्षापासून वेगळे नाही. बौद्ध दर्शन वेदांना प्रामाण्य मानित नाही. ते बुद्धाच्या वचनांवर विश्वास ठेवतात परंतू बुद्धाचे वचन तर स्पष्टपणे लौकिक आहेत म्हणून ते शब्द प्रमाणाचा स्विकार करीत नाही.

**क) वैशेशिक मत :–**

वैशेषिकांच्या मते, शब्दाचा अंतर्भाव अनुमानातच होऊ शकतो, कारण शब्द आणि अनुमान याचा आधार एक समान आहे, म्हणून वैशेषिक दर्शनात शब्द प्रमाणाची व्याख्या मिळत नाही. वैशेषिक सुत्रात कणाद असे म्हणतात की, शब्द अनुमानासारखे आहेत.[1]

प्रशस्तपाद याने सुत्रकाराच्या सुत्राचा अर्थ स्पष्ट करतांना असे म्हटले की, अनुमानात व्याप्तीग्रह, लिंगपरामर्ष, व्याप्तिस्मृति व तदपश्चात अनुमिती होते. याचप्रकारे शब्द ज्ञानात सुद्धा शक्तिग्रह, वाक्यश्रवण, पदार्थस्मृति आणि तदपश्चात वाक्यार्थ बोध होतो. दोघांमध्येही सारखेपणा दिसतो व म्हणून या प्रकारामुळे शब्द अनुमाना. अंतर्गत येते असे त्यांचे मत आहे.

**ड) जैनमत :–**

जैन दर्शनात श्रुत ज्ञान किंवा शब्दज्ञानाला 'आगम' म्हटले आहे आणि याला एक वेगळे प्रमाण सुध्दा मानले आहे. सिद्धसेन दिवाकर, माणिक्यनन्दी, देवसुरी, प्रभाचन्द्र, यशोविजय इत्यादींनी शब्द प्रमाणाच्या लक्षणामध्ये 'आप्त' शब्दालासुद्धा समाविष्ट केलेले दिसुन येते. जैन दर्शनानुसार मोह, राग, व्देष इ. पासून अलिप्त व्यक्तिच आप्त होय.

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

प्रभाचंद्र आणि देवसुरीच्या मतानुसार 'आगम' याची दोन रूपे आहेत –

1) अलौकिक (तिर्थकरांचे वचन),

2) लौकिक (रागव्देषरहित व्यक्तिचे वचन)

**ई) सांख्यमत :–**

शब्दप्रमाणासंदर्भात सांख्य दर्शनाचे मत न्यायांसारखेच आहेत. परंतू आप्त शब्दाच्या व्याख्येते थोडासा फरक आहे दिसुन येतो. सांख्य सुत्रकारानुसार, 'आप्तोपदेश' हा शब्द आहे. परंतू आप्त याचा अर्थ आप्तिकरिता युक्त असा होतो, आप्तिचा तात्पर्य आहे योग्यता आणि उपदेशचा आशय आहे यथाभूत पदार्थाचे निर्दोष कथन. ईश्वर कृष्णाने सुध्दा, विश्वसनिय वचनालाच आप्त वाक्य म्हटले आहे.[2]

**फ) योगमत :–**

योगदर्शनातसुद्धा शब्दाकरीता 'आगम' शब्दाचा प्रयोग करण्यात आलेला दिसुन येतो. व्यासभाष्यात याचा उल्लेख असा मिळतो की, आपल्याला ज्याचे ज्ञान होते त्याचे संप्रेषण करण्याकरीता तत्वज्ञ अर्थात यथार्थद्रष्टा आप्त पुरूष शब्दाच्या माध्यमातून जो उपदेश करतो ते आगम प्रमाण होय.[3]

**ग) मीमांसक मत :**

शबर भाष्या मध्ये शब्दप्रमाणाच्या चर्चेचा आरंभ व उल्लेख आढळुन येतो परंतु त्याचे विधिवत विश्लेषण हे आपल्याला कुमारील यांच्या ग्रंथात दिसते. शबर स्वामी अनुसार, शब्दाव्दारा होणाऱ्या अप्रत्यक्ष वस्तुविषयक ज्ञानाला शाब्द म्हटल्या जाते. कुमारील ने भाष्यकारांच्या कथनाचा आशय असा सांगितला आहे की, शब्द प्रमाण म्हणजे असे कथन जे शब्दांचे अर्थ जाणणाऱ्या श्रोत्याला प्रत्यक्ष ज्ञानाच्या परे असणा–या तत्थ्याचा बोध करून देते.

प्रभाकर यांच्या मतानुसार, लौकिक वा पौरूषेय शब्दबोध हा तर अनुमाना अंतर्गत येतो, अतः अपौरूषेय वैदिक वाक्यांनी युक्त ज्ञानच ख–या अर्थाने शब्द प्रमाण होय.

**य) वेदान्त मत :**

धर्मवाजाश्वरीन्द्र यांच्या मतानुसार, ज्या वाक्याचा तात्पर्य विषयीभूत संसर्ग प्रमाणान्ताने बाधित होत नाही, ते वाक्य म्हणजे आगम. वेदांत मतानुसार, वेदांचा साक्षात्कार केल्या गेला आहे त्याची निर्मिती नव्हे परंतु नैयायिक असे मानतात की वेद ईश्वर निर्मित आहेत.

**ह) न्यायमत :**

न्यायसुत्रकार गौतम हे आप्तवचनाला शब्द प्रमाण मानतात. भाष्यकार वात्स्थायन हे स्पष्ट करतात की, जी वस्तु जशी आहे त्याला तशीच सांगणाऱ्या पुरूषाचा उपदेश म्हणजे शब्द होय. वस्तुचे साक्षात ज्ञान म्हणजे आप्ति आणि आप्तित जे प्रवृत्त होते ते आप्त होय. प्राचिन नैयायिकांनुसार, आप्ताचा उपदेशच (आप्तवचन) शब्द प्रमाण होय.

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

उपरोक्त भारतीय दर्शनांचा विचार करता असे म्हणता येईल की, वेदांच्या निर्मिती संदर्भातील पौरूषेयत्व वा अपौरूषेयत्व याचा विचार जर येथे गौण मानला तर शब्दाला स्वतंत्र रूपात स्विकारणाऱ्या सर्वच तत्वज्ञांचे यावर एकमत आहे की, आप्त पुरूषाचे वचनच शब्द प्रमाण होय.

- **वाक्याचे आधारभूत तत्त्व :**

शब्द प्रमाणाची व्याख्या करतांना तत्त्ववेत्यांनी 'उपदेश' याच्या ऐवजी 'वाक्य' शब्दाचा उपयोग करून हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला की, यासंदर्भात 'वाक्य' याला वेगळे व विशिष्ट असे महत्व आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, पदांच्या समुहाला वाक्य म्हटल्या जाते. परंतु प्रश्न असा उद्भवतो की, कोणत्या पदांच्या समुहाला वाक्य म्हणावे? या संदर्भात व्याकरणाचार्य व तत्त्वज्ञांचे मत आहे की, पदांचा समुहच वाक्य होय. परंतु त्याच पदांचा समुह वाक्य बनतो ज्यातुन निश्चित अर्थ निघत असेल. अतः वाक्याच्या योग्य रचनेकरिता पदांमध्ये परस्पर आकांशा, योग्यता आसक्ति (सन्निधि) व तात्पर्य हे गुण असायला हवेत.

- **वाक्यार्थ बोधाचे प्रकार :**

वाक्यार्थ बोध यासंदर्भात वेगवेगळ्या तत्त्वज्ञांनी वेगवेगळी मते दिलेली दिसुन येते. जेव्हा आपण एखाद्या वाक्याला ऐकतो तेव्हा आपणास त्याच्या अर्थाचा बोध होतो. येथे प्रश्न असा निर्माण होतो की, अर्थ हा संपूर्ण वाक्यातून निघतो की वाक्यातील घटक पदांच्या अर्थाच्या एकत्रिकरणातून? या प्रश्नाबाबत व्याकरणाचार्यांचे मत असे की, वाक्याव्दारा समष्टि रूपात आपल्याला अर्थाचा बोध होत असतो. त्याच्या पदाला किंवा वर्णाला स्वतंत्र अस्तित्व नसते. या व्यतिरिक्त नैयायिकांचे मत आहे की, जसे पूर्व (पहिल्या) वर्णाच्या संस्कारा सहित अन्य वर्ण 'पद' याचे घटक असतात त्याचप्रकारे पूर्व (पहिल्या) पदांच्या संस्कारासहित अंतिम पद 'वाक्या'चा घटक असतो. अ"ाप्रकारे वर्ण आणि पदांचे स्वतंत्र अस्तित्व असते.

वाक्यार्थ बोध या संदर्भात वेगवेगळ्या विचारवंतांनी जी मते मांडली ती पुढीलप्रमाणे :–

1) अभिहितान्वयवाद

2) अन्विताभिदानवाद

3) समुच्चयवाद

4) तात्पर्यवाद

येथे आपण फक्त उपरोक्त दोघांचाच म्हणजे अभिहितान्वयवाद व अन्विताभिदानवाद याचाच विचार करणार आहोत.

- **अभिहितान्वयवाद :–**

कुमारील भट्टांच्या मताप्रमाणे शब्दांना अर्थ असतो व अशा अर्थाचा अन्वय होतो. ते म्हणतात की, पद आपल्या अर्थाला व्यक्त करतात. पदार्थाचे ज्ञान झाल्यानंतर त्या वाक्यार्थाचा बोध होतो. त्यांच्या मते, वाक्यार्थाचा बोध पदांच्या अर्थावर निर्भर असतो. सर्वप्रथम पद सामान्य अर्थाची अभिव्यक्ति करतात,

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

त्या नंतर योग्यता इत्यादींव्दारा त्याच्या अर्थाच्या परस्पर अन्वयाव्दारा ज्या संपूर्ण अर्थाची अभिव्यक्ति होते त्यास वाक्यार्थ म्हटल्या जाते. याचा अर्थ असा की, पदांच्या अर्थाचा बोध हा वेगवेगळा होतो परंतू वाक्याच्या अर्थाचा बोध हा त्या अर्थाचा परस्परांशी असणाऱ्या संयोगावरून निर्धारित होतो. जोपर्यंत पदार्थाचे ज्ञान होत नाही तोपर्यंत वाक्यार्थाचे ज्ञान सुध्दा शक्य नाही. अन्वय म्हणजे सरळ अर्थ अन्वय हा शब्द 'अनु + इ' या धातूपासून आला आहे. एकामागुन एक उच्चारलेले शब्द एकत्र येऊन त्यांचा एकसाची अर्थ होतो असे अभिहितान्वयवाद्यांचे म्हणजे आहे. (स्फोटवाद्यांचेही तेच म्हणने आहे.)[4] भाट्ट मीमांसक म्हणतात की, स्वतंत्रपणे अर्थाविष्कार करणा–या शब्दांचा अन्वय होऊन वाक्यार्थ बनतो . अभिहीत ( अर्थ व्यक्त केलेल्या) "ब्दांचा अन्वय होतो. या मताचे नाव अभिहितान्वयवाद असे आहे. [5] थोडक्यात असे म्हणता येईल की, वाक्याचा अर्थ हा शब्दांच्या एकामागुण एक येणा–या अर्थावरून निर्धारीत होते.

- **अन्विताभिदानवाद :–**

वाक्यातील मुख अर्थ क्रियात्मक असून शब्दांचा एकमेकांशी अन्वय झाल्यावरच सबंध वाक्याच्या अर्थाचा अविष्कार होतो असे प्रभाकराचे म्हणने आहे. अर्थाचे प्रकटिकरण (अभिधान) होण्यासाठी आधी शब्दांचा अन्वय झाला पाहिजे असे हे मत असल्याने त्यास अन्विताभिधानवाद म्हणतात.[6] प्रभाकर शबर स्वामींच्या कथानाचा अर्थ काढतांना असे म्हणतात की, पद व्यक्तिषक्ताचा अभिधाय आहे, तो व्यक्तिषंगाचा अभिधायक नव्हे. याचा अर्थ होतो की पदार्थ शब्दाचा अर्थ अन्वितशी आहे व वाक्यार्थ शब्दाचा अर्थ अन्वयशी आहे. पद अन्वित होऊन त्याद्वारा अन्वयाचा अर्थबोध होतो. प्रभाकर म्हणतात की, वाक्यात येणारे शब्द दोन प्रकारचे कार्य करतात –

1) त्याचा स्वतःचा अर्थ व्यक्त करणे आणि

2) समष्टिच्या अर्थाला व्यक्त करणे.

याप्रमाणे वाक्यार्थ हे वाक्यापासून वेगळे नाही परंतू ते पदांमध्ये असते. प्रत्येक पद आपल्या सामान्य अर्थाबरोबर इतर पदांच्या अर्थाशी संबंधीत असणा–या अर्थाचे सुद्धा ज्ञान करवून देतात. महत्वाचे म्हणजे, वाक्यार्थ हाच प्रमुख असुन शब्दांचा (ध्वनिचिन्हांचा) अन्वय झाल्यावरच वाक्यार्थ प्रकट होतो. म्हणजेच प्रत्येक शब्दाच्या अर्थाच्या एकत्रीकरणातून वाक्यार्थ तयार होतो असे अन्विताभिदानवाद्यांचे मत आहे. त्याचप्रमाणे हे सुद्धा तितकेच खरे आहे की, भाषा रूढ झाल्यावर प्रत्येक शब्दाला अर्थ प्राप्त होतो.

अन्विताभिदानवाद्यांचे मत आहे की, प्रथम पदांव्दाराच संपूर्ण वाक्याचा अर्थाचा बोध होतो. समोरचे शब्द फक्त त्याच्या त्याच अर्थाला स्पष्ट करण्याहेतू पुष्टी देतात ईतकेच. व्यवहार हा वाक्याव्दाराच होतो तो पदांव्दारा कधिही होत नाही. त्यांच्या मते पदांना स्वतःचा अर्थ तेव्हाच शक्य आहे जेव्हा तो त्या वाक्याचा भाग असेल, अन्यथा हे शक्य नाही म्हणजेच त्याचा स्वतःचा असा अर्थ शक्य नाही.

उपरोक्त विचारमंथनावरून आपणास असे म्हणता येईल की, अन्विताभिधानवादी हे वाक्यघटकवादी आहे तर अभिहितान्वयवादी शब्द किंवा पदघटकवादी होय. प्रभाकर प्रणित अन्विताभिदानवादाविरूद्ध कुमारील भाट्ट याप्रकारे तर्क करतात की, वाक्यातील प्रथम पद हे त्या वाक्यात येणाऱ्या सर्वच पदांच्या एकत्रीत अर्थाचे

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

ज्ञान देते तेव्हा इतर पदांचे अस्तित्व निरर्थक ठरते. येथे आपणास असे निदर्शनास येते की, नैमायिकांचा कल अन्विताभिधानवादापेक्षा अभिहितान्वयवादाकडे अधिक झुकलेला आहे, परंतू त्याच बरोबर हे ही आढळते की, जयंत ह्या नैयायिकाने तर अन्विताभिधानवाद व अभिहितान्वयवाद या दोघांचे सुद्धा खंडन केलेले आहे. त्यांच्या मते, संपूर्ण वाक्याव्दारा अर्थाचा बोध होतो असे मानल्यामुळे ज्ञान प्राप्त करणे अशक्यप्राय होऊन जाते कारण वाक्यांची संख्या ही अनंत आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, शब्द प्रमाणाचा अभ्यास नैमायीकांनी जेवढ्या सखोलतेने केलेला आहे तेवढा इतर दर्शनात दिसत नाही म्हणूनतर त्यांना प्रमाण शास्त्र म्हणतात, परंतू असे म्हणणे तेवढे उचित ठरणार नाही, कारण मीमांसा दर्शनात सुद्धा वाक्य, शब्द, पद तथा त्यांच्या अर्थासंबंधी जी सखोलतेने चर्चा झालेली दिसते ती याप्रसंगी महत्वाची वाटते. तसेच अर्थासंबंधी जी वेगवेगळी मते आढळून येतात व ती सर्वच्यासर्वच योग्यही वाटतात. त्यामुळे आपण ज्ञानप्राप्ति करतांना, वाक्यांचा वापर करतांना वेळप्रसंगी प्रसंगावधान ठेवून यांचा उचित उपयोग करायला हवा तेव्हाच आपले ज्ञान हे यथार्थ ठरेल अथवा अप्रमा ज्ञानाचीच भर पडेल व अर्थाचे अनर्थ होईल व भाषा अशुध्द होण्याचा धोखा संभवेल व जर याला आळा घालायचा असेल तर आपण वाक्यार्थबोधाचा अभ्यास करायला हवा. तसेच, 'वाक्यार्थ बोधा संदर्भात वेगवेगळ्या विचारवंतांनी जी मते मांडली त्यासंदर्भात म्हणजे अभिहितान्वयवाद व अन्विताभिदानवाद याचाच विचार करून न्यायांनी या संदर्भात केलेल्या कार्यापेक्षा मीमांसकांचे कार्य उल्लेखनिय व भरीव आहे असे मला वाटते', ही जी सिध्दांतकल्पना वर शोधनिबंधात घेण्यात आली होती ती सिध्द झाली असे मला म्हणावेसे वाटते.

## संदर्भ ग्रंथ सूचि :

1) शब्दोपमानयोर्नैव पृथक प्रामाण्यमिष्यते।
अनुमानगतार्थत्वादिति वै''ोषिक मतम्।।
एतेन शाब्द व्याख्यातम् – (वैशषिक सुत्र 1–2–3)
2) आप्तश्रुतिराप्तवचनं तुः – सांख्सकारीका 5
3) स्वबोधसंक्रान्तये शब्देनोपदिश्यते शब्दात्तदर्शविषयावृत्तिः श्रोतुरागमः, – व्यासभाष्य 1.1.7
4) मराठी तत्वज्ञान महाकोष – दे. द. वाडेकर, खंड 2, पृ. क्र. 410 आ. 1974
5) श्रीनिवास हरी दिक्षित, – 'भारतीय तत्त्वज्ञान', फडके प्रका''न कोल्हापर, पृ. क्र. 299, 2002.
6) कित्ता – पृ. क्र. 298
7) अशोक कुमार वर्मा, – ज्ञानमीमांसा एवं द्रव्यमीमांसा, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, 1989
8) डॉ. चक्रधर बिजल्वान – 'भारतीय न्यायशास्त्र' (उत्तर प्रदेष हिन्दी संस्थान, 1989).
9) डॉ. नन्द कि''ोर शर्मा – 'भारतीय दार्शनिक समस्याएं' राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर, 1998.
10) प्रा. दे. द. वाडेकर, –'मराठी तत्त्वज्ञान महाकोश, (त्रिखंडात्मक, खंड 2, महाकोश मंडळ, पूणे, 1974).
11) सुनिलचंद्र मिश्र – 'भारतीय दर्शन' प्रतियोगिता साहित्य सीरीज, 2003.
12) डॉ. विश्वनाथ प्रसाद वर्मा – 'भारतीय दर्शन' ज्ञानदा प्रकाशन, नई दिल्ली, 2002.
13) J.N. Sinha – History of Indian Philosophy, Central Book Agency, 1952.
14) M. Hiriyanna – Outline of Indian Philosophy Blackie & son (India) Ltd., New Delhi -1979

# @ भाषा आणि जीवन


**मराठी अभ्यास परिषद**
आनंदनगर, पुणे ४११०५१.

bhashajivan@gmail.com
Tel– 03247-256977
Fax– 03249 – 256977



(This is a referred journal and all articles are professionally screened and reviewed. The articles reflect the opinion / views of authors. The editorial board is no way responsible for the same)